PRAVIN C
PUBLICATION

प्रा. प्रविण चोरमले सरांची

मास्टर अनॅलिसीस सिरीज

# कंबाईन पूर्व - गट ब आणि क

2012 ते 2022 पर्यंतच्या प्रश्नपत्रिकांचे सखोल विश्लेषण



6वी सुधारित आवृत्ती

2023च्या अभ्यासक्रमानुसार सर्व 10 पदांसाठी उपयुक्त!

PRAVIN C PUBLICATION

# INDEX कंबाईन (पूर्व) परीक्षा

## 1 राज्यशास्त्र 9


| क्र. | विषय | प्रश्न संख्या | पृष्ठ |
|---|---|---|---|
| **१** | **संविधान सभा व समित्या** | **१११** | **१०** |
| 1.1 | **संविधान निर्मिती प्रक्रिया** | 6 | 10 |
| 1.2 | **संविधान सभा व समित्या** | | 14 |
| | समित्या | 5 | 14 |
| | संविधान सभा | 12 | 16 |
| 1.3 | **जम्मू-काश्मीर राज्यघटना** | 1 | 21 |
| 1.4 | **घटना वैशिष्ट्ये** | | 21 |
| | सुची | 4 | 21 |
| | स्त्रोत | 2 | 28 |
| | कलमे | 4 | 29 |
| | परिशिष्टे / अनुसूची | 2 | 30 |
| | संघराज्य | 5 | 33 |
| 1.5 | **सरनामा** | | 38 |
| | 42 वी घटनादुरुस्ती | 3 | 38 |
| | वर्णन | 1 | 39 |
| | वैशिष्ट्ये | 5 | 39 |
| 1.6 | **राज्य व राज्यनिर्मिती (कलम 1 ते 4)** | | 42 |
| | भारत - राज्ये संघराज्ये | 9 | 43 |
| 1.7 | **नागरिकत्व (कलम 5 ते 11)** | | 47 |
| | नागरिकत्व कायदा | 2 | 47 |
| | नागरिकत्व विधाने व तरतुदी | 4 | 47 |
| 1.8 | **मूलभूत हक्क (कलम 12 ते 35)** | 15 | 50 |
| 1.9 | **मार्गदर्शक तत्त्वे (कलम 36 ते 51)** | 13 | 58 |
| 1.10 | **मूलभूत कर्तव्य कलम (51 A)** | 14 | 63 |
| 1.11 | **घटना दुरुस्ती (कलम 368)** | 4 | 67 |
| **२** | **संसदीय कार्यपद्धती व न्यायालयीन व्यवस्था** | **६३** | **७४** |
| 2.1 | **राष्ट्रपती** | | 74 |
| | अधिकार | 5 | 74 |
| | महाभियोग | 1 | 75 |
| | राष्ट्रपती-पंतप्रधान | 3 | 76 |
| | निवडणूक | 1 | 78 |
| 2.2 | **लोकसभा** | | 79 |
| | कार्यपद्धती | 1 | 79 |
| 2.3 | **राज्यसभा** | | 80 |
| | प्रतिनिधित्व | 3 | 80 |
| 2.4 | **पंतप्रधान** | | 82 |
| | कार्य | 2 | 82 |
| 2.5 | **मंत्रिमंडळ** | | 85 |
| | कलमे | 1 | 85 |
| 2.6 | **संसद कामकाज पद्धती/ संसद** | | 85 |
| | विधेयके | 4 | 85 |
| | समित्या | 1 | 87 |
| | कलमे | 1 | 87 |
| | संसद सदस्य | 1 | 88 |
| | अधिवेशन | 1 | 88 |
| 2.7 | **विविध आयोग** | 10 | 89 |
| 2.8 | **आणीबाणी** | 3 | 94 |
| 2.9 | **निवडणुक आयोग व निवडणुका** | | 96 |
| | निवडणुका | 6 | 96 |
| | चालू घडामोडी | 3 | 99 |
| 2.10 | **न्यायालयीन व्यवस्था** | | 101 |
| | सर्वोच्च न्यायालय | 2 | 101 |
| | उच्च न्यायालय | 9 | 102 |
| 2.11 | **CAG/महान्यायवादी** | 2 | 106 |
| 2.12 | **केंद्र-राज्य संबंध** | 3 | 108 |
| **३** | **राज्य विधीमंडळ** | **४३** | **११०** |
| 3.1 | **राज्यपाल** | 10 | 110 |
| | नामनिर्देशन | 2 | 110 |
| | कार्यकाल | 1 | 111 |
| | कार्य व अधिकार | 7 | 112 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3.2 | मुख्यमंत्री | 9 | 116 |
| | मंत्रिमंडळ सदस्यसंख्या | 2 | 116 |
| | आतापर्यंतचे मुख्यमंत्री/ महिला मुख्यमंत्री | 3 | 116 |
| | कलमे | 3 | 118 |
| | मंत्रिमंडळ | 1 | 119 |
| 3.3 | विधानसभा | 4 | 120 |
| 3.4 | विधानपरिषद | 5 | 123 |
| 3.5 | महाधिवक्ता | 8 | 125 |
| 3.6 | महत्त्वाच्या संस्था/लोकपाल/ लोकायुक्त | 2 | 128 |
| 3.7 | निवडणुका व आयोग (महाराष्ट्र) | 5 | 129 |
| ४ | पंचायत राज | ६४ | १३१ |
| 4.1 | पंचायत राज व्यवस्था/ महाराष्ट्र पंचायत राज कायदे | 9 | 131 |
| 4.2 | 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती | 9 | 133 |
| 4.3 | ग्रामपंचायत/ग्रामसभा/सरपंच/ ग्रामसेवक | 27 | 143 |
| 4.4 | पंचायत समिती/सभापती /सरपंच समिती/गट विकास अधिकारी | 5 | 152 |
| 4.5 | जिल्हा परिषद/अध्यक्ष/ समित्या/ मुख्य कार्यकारी अधिकारी | 8 | 154 |
| 4.6 | महानगरपालिका/महापौर/समित्या | 2 | 157 |
| 4.7 | पंचायत राजशी संबंधित समित्या | 4 | 158 |


## 2 अर्थशास्त्र 161


| क्र. | विषय | प्रश्न संख्या | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | नियोजन (Planning)/इतर योजना | ३६ | १६२ |
| 1.1 | राष्ट्रीय उत्पन्न समिती | 2 | 162 |
| 1.2 | निती आयोग | 2 | 164 |
| 1.3 | भारतीय नियोजन : मूलभूत तथ्ये/बाबी | 2 | 166 |
| 1.4 | नियोजनाची प्रतिमाने | 1 | 168 |
| 1.5 | कालावधी | 1 | 168 |
| 1.6 | उद्दिष्टे | 1 | 169 |
| 1.7 | वृद्धी दर | 3 | 169 |
| 1.8 | पहिली पंचवार्षिक योजना | 2 | 172 |
| 1.9 | दुसरी पंचवार्षिक योजना (1956-61) | 4 | 173 |
| 1.10 | चौथी पंचवार्षिक योजना | 1 | 175 |
| 1.11 | नववी पंचवार्षिक योजना (1997-2002) | 2 | 175 |
| 1.12 | अकरावी पंचवार्षिक योजना (2002-07) | 4 | 176 |
| 1.13 | बारावी पंचवार्षिक योजना | 3 | 179 |
| 1.14 | प्राथमिक/द्वितीय सेवा क्षेत्र यांचा जीडीपीतील वाटा/प्रमाण | 3 | 180 |
| 1.15 | नियोजनसंबंधी इतर योजना | 5 | 182 |
| | पंचवार्षिक योजना | | 184 |
| २ | शेती | २२ | १९३ |
| 2.1 | स्थुल देशांतर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा | 3 | 193 |
| 2.2 | भारतीय शेती | 11 | 194 |
| 2.3 | शेतीशी निगडित उद्योग/ पशूपालन | 3 | 200 |
| 2.4 | शेती - वित्त पुरवठा/आर्थिक नियोजन | 3 | 201 |
| 2.5 | मासेमारी | 2 | 202 |
| ३ | उद्योग | २८ | २०४ |
| 3.1 | औद्योगिक विकासाशी संबंधित संस्था | 1 | 204 |
| 3.2 | सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग | 2 | 205 |
| 3.3 | उद्योगांचे प्रकार/ विविध उद्योग | 3 | 207 |
| 3.4 | समस्या / सुधारणा | 3 | 209 |
| 3.5 | औद्योगिक वित्त | 1 | 210 |
| 3.6 | औद्योगिक धोरणे संबंधित कायदे | 5 | 210 |
| 3.7 | नवे औद्योगिक धोरण - 1991 नंतरचे बदल | 5 | 212 |
| 3.8 | स्थूल देशांतर्गत उत्पादन वाटा | 3 | 215 |
| 3.9 | दळणवळण | 2 | 216 |
| 3.10 | निर्देशांक | 1 | 217 |
| 3.11 | सेवा क्षेत्र | 2 | 218 |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **परकीय व्यापार आणि व्यवहारतोल** | **३८** | **२१९** |
| 4.1 | आयात | 5 | 219 |
| 4.2 | निर्यात | 9 | 222 |
| 4.3 | व्यवहारतोल | 1 | 225 |
| 4.4 | व्यापारशेष | 1 | 226 |
| 4.5 | FDI | 5 | 227 |
| 4.6 | रुपयाचे अवमूल्यन | 3 | 229 |
| 4.7 | रुपयाची परिवर्तनियता | 1 | 230 |
| 4.8 | SEZ / EPZ | 5 | 230 |
| 4.9 | व्यापार संबंधित आंतरराष्ट्रीय संघटना व करार | 8 | 232 |
| ५ | **सार्वजनिक वित्त** | **७४** | **२३७** |
| 5.1 | राजकोषीय धोरणाची उद्दिष्ट्ये | 4 | 237 |
| 5.2 | तुटीचा भरणा व तुटीच्या संकल्पना | 10 | 239 |
| 5.3 | अर्थसंकल्प / अंदाजपत्रक | 17 | 244 |
| 5.4 | भारतीय कर व्यवस्था/रचना | 15 | 250 |
| 5.5 | वित्त आयोग | 8 | 256 |
| 5.6 | पैसा, पुरवठा, कार्य, सिद्धांत | 6 | 258 |
| 5.7 | राष्ट्रीय उत्पन्न | 7 | 261 |
| 5.8 | अर्थविषयक संसदीय समित्या | 2 | 264 |
| 5.9 | FRBM | 5 | 265 |
| ६ | **बँकिंग** | **५४** | **२६७** |
| 6.1 | भारतीय रिझर्व्ह बँक | 21 | 267 |
| 6.2 | इतर बँका | 16 | 274 |
| 6.3 | बँकींग | 17 | 281 |
| ७ | **दारिद्र्य आणि रोजगार** | **५९** | **२८६** |
| 7.1 | दारिद्र्य विषयक समित्या | 11 | 286 |
| 7.2 | बेरोजगार/रोजगार | 36 | 290 |
| 7.3 | मानव विकास निर्देशांक | 12 | 300 |
| ८ | **LPG धोरण / जागतिकीकरण** | **१** | **३०४** |
| 8.1 | उ.खा.जा. | 1 | 304 |
| ९ | **लोकसंख्या (Population)** | **३८** | **३०५** |
| 9.1 | लोकसंख्या स्थित्यंतर/संक्रमण | 5 | 305 |
| 9.2 | जननदर | 4 | 308 |
| 9.3 | भारत लोकसंख्या | 3 | 310 |
| 9.4 | भारत - 2011 जणगणना | 11 | 311 |
| 9.5 | लोकसंख्या धोरणे | 4 | 316 |
| 9.6 | महाराष्ट्र लोकसंख्या 2011 | 11 | 317 |


## 3 इतिहास 321


| क्र. | विषय | प्रश्न संख्या | पृष्ठ |
|---|---|---|---|
| **1** | **आदिवासी व शेतकरी उठाव** | | **322** |
| 1.1 | आदिवासी व शेतकरी उठाव | 15 | 322 |
| 1. | आदिवासी भिल्लांचा उठाव | 3 | 322 |
| 2. | रामोशी उठाव | 1 | 323 |
| 3. | संथाळांचा उठाव | 2 | 324 |
| 4. | कोळी उठाव | 2 | 325 |
| 5. | शेतकऱ्यांचा उठाव | 3 | 326 |
| 6. | निळीचा उठाव | 1 | 327 |
| 7. | एकत्रित उठाव | 2 | 327 |
| 8. | साहित्य | 1 | 328 |
| **2** | **1857 चा उठाव** | | **329** |
| 2.1 | 1857 चा उठाव | 30 | 329 |
| 1. | स्वरूप | 2 | 329 |
| 2. | कारणे | 2 | 330 |
| 3. | वैशिष्ट्ये | 1 | 331 |
| 4. | 1857 च्या उठावात महाराष्ट्र | 6 | 332 |
| 5. | परिणाम | 5 | 335 |
| 6. | साहित्य | 1 | 337 |
| 7. | संबंधित व्यक्ती | 7 | 337 |

PRAVIN C PUBLICATION


| | | | |
|---|---|---|---|
| **3** | **गव्हर्नर जनरल** | | **340** |
| 3.1 | **गव्हर्नर जनरल** | 20 | 340 |
| 1. | लॉर्ड डलहौसी (1848-56) | 5 | 340 |
| 2. | लॉर्ड मेयो (1869-72) | 1 | 343 |
| 3. | लॉर्ड रिपन (1880-84) | 1 | 343 |
| 4. | विल्यम बेंटिंक (1828-35) | 1 | 344 |
| 5. | लॉर्ड लिटन (1876-80) | 1 | 348 |
| 6. | लॉर्ड डफरिन (1884-88) | 1 | 348 |
| 7. | लॉर्ड वेलस्ली (1798-1805) | 1 | 349 |
| 8. | लॉर्ड कर्झन (1898-1905) | 1 | 349 |
| 9. | लॉर्ड कॅनिंग (1856-62) | 2 | 350 |
| 10. | सी. रोजगोपालचारी | 2 | 352 |
| 11. | इतर | 3 | 352 |
| **4** | **कायदे** | **12** | **355** |
| 1. | 1773 | 1 | 355 |
| 2. | 1813 | 1 | 356 |
| 3. | 1858 | 5 | 357 |
| 4. | 1919 | 4 | 358 |
| 5. | 1935 | 1 | 362 |
| **5** | **महसूल व्यवस्था** | **20** | **365** |
| 1. | ग्रंथ | 3 | 365 |
| 2. | महसुल संबंधित बाबी | 4 | 366 |
| 3. | विचारवंत | 2 | 368 |
| 4. | व्यक्ती/गव्हर्नर | 3 | 369 |
| 5. | महसूल पद्धती | 6 | 370 |
| 6. | वसाहतवाद, परिणाम | 2 | 372 |
| **6** | **शिक्षण, दळणवळण व वृत्तपत्र** | **29** | **373** |
| 1. | शिक्षण | 9 | 373 |
| 2. | रेल्वे / विमान | 9 | 378 |
| 3. | वृत्तपत्रे | 8 | 380 |
| 4. | पुस्तके | 1 | 385 |
| 5. | विचारवंत-विधाने | 2 | 385 |
| **7** | **सामाजिक सुधारणा / भारतातील समाजसुधारणा** | **19** | **386** |
| 1. | आर्य समाज | 3 | 386 |
| 2. | प्रार्थना समाज | 3 | 387 |
| 3. | ब्राह्मो समाज व राजा राममोहन रॉय | 6 | 389 |
| 4. | रामकृष्ण मिशन | 1 | 393 |
| 5. | परमहंस सभा | 4 | 393 |
| 6. | इतर | 4 | 395 |
| **8** | **महाराष्ट्रातील समाजसुधारक** | **122** | **397** |
| 1. | महात्मा फुले | 19 | 397 |
| 2. | राजर्षी शाहू महाराज | 14 | 403 |
| 3. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 17 | 408 |
| 4. | गो. ग. आगरकर | 11 | 413 |
| 5. | महर्षी कर्वे | 14 | 416 |
| 6. | वि. रा. शिंदे | 2 | 419 |
| 7. | कर्मवीर भाऊराव पाटील | 1 | 420 |
| 8. | महादेव गोविंद रानडे | 2 | 421 |
| 9. | लोकहितवादी | 2 | 423 |
| 10. | विष्णुबुवा ब्रह्मचारी | 1 | 424 |
| 11. | रा.गो. भांडारकर | 1 | 425 |
| 12. | पंडिता रमाबाई | 3 | 425 |
| 13. | रमाबाई रानडे | 1 | 426 |
| 14. | नाना शंकरशेठ | 2 | 426 |
| 15. | बेहरामजी मलबारी | 1 | 427 |
| 16. | ग. वा. जोशी | 1 | 427 |
| 17. | वि. दा. सावरकर | 1 | 428 |
| 18. | शिवराम जानबा कांबळे | 2 | 428 |
| 19. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | 1 | 428 |
| 20. | भाऊ दाजी लाड | 1 | 429 |
| 21. | बाळशास्त्री जांभेकर | 2 | 429 |
| 22. | इतर महत्त्वाच्या महिला/व्यक्ती | 23 | 431 |
| **9** | **काँग्रेस पूर्व संघटना व कार्य** | | **442** |
| 9.1 | **काँग्रेस पूर्व संघटना व कार्य** | 15 | 442 |
| 1. | दादाभाई नौरोजी | 4 | 442 |
| 2. | बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन | 2 | 445 |
| 3. | द बॉम्बे असोसिएशन | 3 | 445 |
| 4. | इंडियन लीग, इंडियन असोसिएशन | 2 | 447 |
| 5. | यंग बेंगाल | 1 | 448 |
| 6. | डेक्कन सभा | 1 | 448 |
| 7. | एकत्रित | 2 | 449 |

PRAVIN C PUBLICATION

# INDEX कंबाईन (पूर्व) परीक्षा


| | | | |
|---|---|---|---|
| **10** | **काँग्रेसची स्थापना** | **16** | **450** |
| 1. | अधिवेशने | 9 | 450 |
| 2. | वैशिष्ट्ये | 1 | 453 |
| 3. | विधाने | 3 | 454 |
| 4. | नेते सहभाग | 3 | 455 |
| **11** | **मवाळ युग** | **34** | **457** |
| 11.1 | **मवाळ युग** | 7 | 457 |
| 1. | विधाने | 2 | 457 |
| 2. | नेते | 5 | 458 |
| 11.2 | **जहाल युग** (1905-1920) | 27 | 460 |
| 1. | कायदे | 1 | 460 |
| 2. | बंगाल फाळणी | 2 | 461 |
| 3. | वृत्तपत्रे | 4 | 461 |
| 4. | चळवळी | 5 | 464 |
| 5. | संस्था | 1 | 467 |
| 6. | आयोग | 1 | 467 |
| 7. | संघटना | 1 | 467 |
| 8. | अधिवेशने | 2 | 468 |
| 9. | इतर | 10 | 469 |
| **12** | **गांधी युग (1915-1928)** | **59** | **473** |
| 12.1 | **गांधी युग** (1915-1928) | 30 | 473 |
| 1. | 1919 कायदा/मुडिमन समिती | 2 | 473 |
| 2. | चळवळी | 16 | 474 |
| 3. | पक्ष | 6 | 482 |
| 4. | सायमन कमिशन | 4 | 485 |
| 5. | नेहरु रिपोर्ट | 2 | 487 |
| 12.2 | **गांधी युग** (1929-1940) | 16 | 489 |
| 1. | चळवळी | 3 | 489 |
| 2. | कायदे | 5 | 491 |
| 3. | अधिवेशने | 2 | 494 |
| 4. | इतर | 6 | 495 |
| 12.3 | **गांधी युग** (1941-1947) | 13 | 498 |
| 1. | भूमिगत चळवळ /गुप्त संघटना | 1 | 498 |
| 2. | ब्रिटिश धोरणे | 3 | 498 |
| 3. | चळवळी/ पत्री सरकार | 5 | 499 |
| 4. | भारतीय कार्यक्रम/ आंदोलन | 2 | 500 |
| 5. | रॉयल इंडियन नेव्ही – उठाव | 1 | 501 |
| 6. | 1942 च्या चळवळीच्या अपयशाची कारणे | 1 | 502 |
| **13** | **भारतातील क्रांतिकारी चळवळी** | **35** | **503** |
| 1. | महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ | 20 | 503 |
| 2. | भारतातील क्रांतिकारी चळवळ | 4 | 507 |
| 3. | भारताबाहेरील क्रांतिकारी चळवळ | 7 | 509 |
| 4. | संघटना | 1 | 512 |
| **14** | **नेताजी सुभाषचंद्र बोस** | **4** | **515** |
| **15** | **फुटीरतावादी चळवळ** | **11** | **517** |
| 1. | सय्यद अहमद खान | 2 | 517 |
| 2. | मुस्लीम लिग | 8 | 519 |
| 3. | जनसंघ | 1 | 519 |
| **16** | **कामगार** | **17** | **523** |
| 1. | कायदे | 4 | 523 |
| 2. | पक्ष/ संघटना | 13 | 524 |
| **17** | **शेतकरी/साम्यवादी** | **3** | **529** |
| **18** | **स्वातंत्र्योत्तर भारत** | **2** | **531** |
| **19** | **संयुक्त महाराष्ट्र चळवळ** | **6** | **532** |
| 1. | सभा/संघटना | 4 | 532 |
| 2. | कथा/कादंबरी | 1 | 533 |
| 3. | वृत्तपत्रे/नियतकालिके | 1 | 533 |
| **20** | **महिला चळवळ/सहभाग** | **4** | **535** |

PRAVIN C PUBLICATION

# 4 भूगोल 537


| १ | भारताचा भूगोल | ११३ | ५३८ |
|---|---|---|---|
| 1. | भारतीय प्रमाणवेळ | 4 | 538 |
| | रेखांश/रेखावृत्ते | 2 | 539 |
| | अक्षांश/अक्षवृत्ते | 1 | 540 |
| 2. | खंड निर्मिती प्रक्रिया | 1 | 541 |
| 3. | भारत : भौगोलिक रचना | 7 | 542 |
| 4. | नद्या | 15 | 547 |
| 5. | पर्वते, शिखरे / खिंडी | 8 | 555 |
| 6. | सागर, आखात, सरोवरे | 4 | 561 |
| 7. | वने | 3 | 564 |
| 8. | हवामान | 13 | 569 |
| 9. | खनिज संपत्ती | | 575 |
| | लोहखनिज | 2 | 575 |
| | दगडी कोळसा | 2 | 577 |
| | बॉक्साईट | 2 | 578 |
| | खनिज तेल | 3 | 579 |
| | खडक/खनिजे | 2 | 580 |
| 10. | उद्योग | 13 | 582 |
| 11. | दळणवळण | | 588 |
| | रेल्वे | 7 | 588 |
| | कॉरिडॉर/महामार्ग | 9 | 591 |
| | इतर | 2 | 596 |
| 12. | राज्ये व वैशिष्ट्ये | 5 | 598 |
| 13. | महत्त्वाची ठिकाणे | 1 | 600 |
| 14. | बेटे, लेण्या | 3 | 600 |
| 15. | ऊर्जा निर्मिती | 6 | 601 |
| 16. | ग्रामीण-वसाहती विकास | 5 | 604 |
| 17. | शेती | 16 | 605 |
| 18. | कृषी विषयक कायदे | 1 | 611 |
| 19. | जमिनीची धूप / समस्या | 1 | 611 |
| 20. | भूकंप | 1 | 612 |

| २ | महाराष्ट्राचा भूगोल | २१० | ६१३ |
|---|---|---|---|
| 2.1 | विस्तार | 5 | 613 |
| 2.2 | खडक प्रकार | 6 | 617 |
| 2.3 | मृदा | 4 | 619 |
| 2.4 | भौगोलिक रचना | 8 | 621 |
| 2.5 | नद्या | 40 | 624 |
| 2.6 | पर्वत /शिखरे | 12 | 642 |
| 2.7 | बेटे / लेण्या | 5 | 645 |
| 2.8 | वने/अभयारण्ये | 12 | 647 |
| 2.9 | हवामान/पर्जन्य | 18 | 654 |
| 2.10 | खनिज संपत्ती | 13 | 663 |
| 2.11 | उद्योग | 8 | 669 |
| 2.12 | मासेमारी/मत्स्य व्यवसाय | 4 | 672 |
| 2.13 | शेती व संबंधित उद्योग | 19 | 674 |
| 2.14 | दळणवळण | 9 | 680 |
| 2.15 | जिल्हे / विभाग | 11 | 685 |
| 2.16 | सांस्कृतिक ठिकाणे (पर्यटन/लेण्या) | 6 | 693 |
| 2.17 | भौगोलिक ठिकाणे (झरे/धबधबे /थंड हवेची ठिकाणे) | 10 | 696 |
| 2.18 | जमाती (आदिवासी) | 9 | 700 |
| 2.19 | ऊर्जा साधने | 9 | 703 |
| 2.20 | प्रदूषण | 1 | 707 |
| 2.21 | जैवविविधता/पर्यावरण | 1 | 707 |
| ३ | लोकसंख्या | २७ | ७०८ |
| 3.1 | भारत | 9 | 708 |
| | जागतिक लोकसंख्या | 1 | 708 |
| | संक्रमण अवस्था | 2 | 708 |
| | लोकसंख्या वाढ | 1 | 709 |
| | स्थलांतर | 2 | 710 |
| | अनु. जाती लोकसंख्या | 1 | 712 |
| | वर्गीकरण | 1 | 712 |
| | घनता | 1 | 712 |

# INDEX कंबाईन (पूर्व) परीक्षा


| | | | |
|---|---|---|---|
| 3.2 | महाराष्ट्र | 18 | 714 |
| | साक्षरता | 1 | 714 |
| | घनता | 4 | 717 |
| | लिंग गुणोत्तर | 5 | 719 |
| | नागरिकरण | 3 | 722 |
| | लोकसंख्या क्रम | 1 | 724 |
| | लोकसंख्या वाढ | 2 | 726 |
| | भाषा | 1 | 727 |
| | इतर | 1 | 727 |

| | | | |
|---|---|---|---|
| **४** | **प्राकृतिक भूगोल/ हवामान** | **१९** | **७२८** |
| 4.1 | मृदा निर्मिती व मृदेचे प्रकार | 3 | 728 |
| 4.2 | पृथ्वी | 1 | 729 |
| 4.3 | भू-आकार | 3 | 732 |
| 4.4 | वनांचे प्रकार | 5 | 738 |
| 4.5 | वारे/वारे निर्मिती आणि प्रकार | 2 | 740 |
| 4.6 | खगोलशास्त्र | 2 | 741 |
| 4.7 | पर्यावरण | 3 | 743 |


## 5 सा. विज्ञान 745



| क्र. | विषय | प्रश्न संख्या | पृष्ठ |
|---|---|---|---|
| **१** | **भौतिकशास्त्र** | **९१** | **७४६** |
| 1.1 | राशी आणि राशीचे मापन | 1 | 746 |
| 1.2 | चाल, वेग आणि विस्थापन | 2 | 746 |
| 1.3 | वजन, वस्तुमान आणि घनता | 1 | 747 |
| 1.4 | गती व बल | 1 | 747 |
| 1.5 | कार्य/ऊर्जा/शक्ती | 2 | 748 |
| 1.6 | ऊर्जा आणि दाब | 7 | 748 |
| 1.7 | उष्णता व तापमान | 12 | 750 |
| 1.8 | ध्वनी | 13 | 754 |
| 1.9 | प्रकाश/आरसा/भिंग | 17 | 759 |
| 1.10 | विद्युत धारा | 21 | 766 |
| 1.11 | खगोलशास्त्र | 6 | 771 |
| 1.12 | चुंबकीय क्षेत्र | 1 | 773 |
| 1.13 | किरणोत्सारीता | 7 | 774 |
| **२** | **रसायनशास्त्र** | **८९** | **७७७** |
| 2.1 | द्रव्य, पदार्थ आणि पदार्थांचे अवस्थांतर | 5 | 777 |
| 2.2 | अणु संरचना | 18 | 778 |
| 2.3 | मूलद्रव्य आवर्तसारणी, वर्गीकरण | 12 | 784 |
| 2.4 | धातू, अधातू आणि धातू सदृश्य मूलद्रव्य | 19 | 787 |
| 2.5 | आम्ल, आम्लारी आणि क्षार | 9 | 793 |
| 2.6 | रासायनिक अभिक्रिया | 9 | 796 |
| 2.7 | कार्बन | 9 | 799 |
| 2.8 | दैनिक रसायनशास्त्र | 4 | 802 |
| 2.9 | शास्त्रज्ञ | 2 | 803 |
| 2.10 | संकीर्ण | 2 | 803 |
| **३** | **प्राणीशास्त्र** | **७५** | **८०४** |
| 1. | वर्गीकरण | 50 | 804 |
| 2. | पेशी | 2 | 822 |
| 3. | ग्रंथी /संप्रेरक | 2 | 823 |
| 4. | रक्ताभिसरण संस्था | 7 | 823 |
| 5. | पचनसंस्था | 2 | 827 |
| 6. | श्वसनसंस्था | 1 | 828 |
| 7. | प्रजनन | 2 | 828 |
| 8. | चेतासंस्था | 1 | 830 |
| 9. | उत्सर्जन संस्था | 1 | 830 |
| 10. | ज्ञानेंद्रिय | 7 | 831 |
| **४** | **आहारशास्त्र** | **६१** | **८३४** |
| 1. | संतुलित आहार/पोषकतत्त्वे/ जीवनसत्त्वे | 18 | 834 |
| 2. | मानवी रोग विकार | 39 | 839 |
| 3. | कार्यक्रम | 1 | 852 |
| 4 | इतर | 3 | 852 |
| **५** | **वनस्पतीशास्त्र** | **६०** | **८५३** |
| 1. | वनस्पती वर्गीकरण | 19 | 853 |
| 2. | पेशी | 2 | 859 |
| 3. | वनस्पती अवयव | 2 | 859 |
| 4. | पोषणद्रव्ये/ सुक्ष्म अन्नद्रव्ये | 8 | 861 |
| 5. | जैविक कीटक/शेवाळ/बुरशी | 13 | 863 |
| 6. | वनस्पती वाढ | 4 | 867 |
| 7. | रोग/तणनाशक/कीटक | 15 | 868 |

PART 1



# राज्यशास्त्र

# विभाग



# 1 संविधान सभा व समित्या

## 1.1 संविधान निर्मिती प्रक्रिया

### आवाका

| | |
|---|---|
| संविधान सभा | ✓ कॅबिनेट मिशन योजना<br>✓ 1947 च्या कायद्याने बदल<br>✓ त्याबाबतची महत्त्वाची वक्तव्ये |
| महत्त्वाच्या तारखा | ✓ अंमलबजावणी<br>✓ संमती |

### (1) महत्त्वाच्या घटना

**1. भारताची संविधानसभा बनवण्याची मागणी इंग्रजांनी कोणत्या वर्षी मान्य केली ? (संयुक्त पूर्व गट–क 2022)**

(1) 1938 (2) 1939

(3) 1940 (4) 1942

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 3**

- 8 ऑगस्ट 1940 रोजी **'व्हाईसरॉय लिनलिथगो'** याने एक घोषणा केली, ज्यामध्ये **प्रथमच भारतीयांसाठी स्वत:चे संविधान असेल.** याचा उल्लेख केलेला होता. याच 'ऑगस्ट घोषणे'मध्ये विविध घोषणा करण्यात आल्या, त्या खालीलप्रमाणे :
  1. व्हाईसरॉयच्या सल्लागारी तसेच कार्यकारी मंडळामध्ये भारतीयांची संख्या वाढवण्यात येणार.
  2. अल्पसंख्यांकांना विश्वासात न घेता कोणतीही संविधानानिक तरतूद लागू केली जाणार नाही.
  3. युद्धाच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी (युद्ध विचारविनिमय समिती) स्थापन करण्यात येईल.
  4. युद्ध समाप्तीनंतर भारतीयांच्या विविध घटकांच्या प्रतिनिधींना बोलावून संविधान निर्मितीबाबत चर्चा केली जाईल.
- **'ऑगस्ट घोषणा' साहजिकच मुस्लीम लीग ने मान्य केली. मात्र भारतीय काँग्रेसने या घोषणेचा पूर्णत: अस्वीकार केला.**
- 9 डिसेंबर 1941 मध्ये ब्रिटिश पंतप्रधान यांनी भारतीयांना 'अटलांटिक चार्टर' भारतासाठी लागू नसल्याची घोषणा केली. यावरून भारतीयांना ब्रिटिश स्वातंत्र्य देणार नाहीत, ही भावना दृढ होत गेली, आणि त्यातूनच पुढे 1942 चा लढा सुरू झाला.

**2. भारतीय लोक आपल्या देशाचे प्रशासन किती उत्तम प्रकारे चालवू शकतात हे पहाण्यासाठी 1930 ते 1932 च्या दरम्यान लंडनमध्ये ....... गोलमेज परिषदा घेण्यात आल्या. (संयुक्त पूर्व गट–क 2022)**

(1) दोन (2) चार

(3) तीन (4) पाच

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 3**

- **लॉर्ड आयर्विनने 31 ऑगस्ट 1929 च्या घोषणेप्रमाणे** हिंदुस्थानच्या संविधानाविषयी चर्चा करण्यासाठी गोलमेज परिषद भरेल, ही घोषणा केली होती.
- त्यामध्ये सायमन कमिशन (1927) ला विरोध झाला. त्यातून सविनय कायदेभंग चळवळ (1929) भारतात चालू झाली. या भारतीयांच्या संतप्त भावना शमविण्यासाठी ब्रिटनमध्ये 3 गोलमेज परिषदांचे आयोजन करण्यात आले.
- ब्रिटिश **पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली पहिली** गोलमेज परिषद 6 नोव्हेंबर 1930 ते 19 जानेवारी 1931 पर्यंत चालू होती. काँग्रेसने यावर बहिष्कार टाकला होता. मात्र ब्रिटिश इंडियाचे एकूण 57 प्रतिनिधी हजर होते. यामध्ये पहिल्या परिषदेमध्ये मध्यवर्ती राज्यकारभार संघीय की एकात्म असावा यावर चर्चा झाली. **सायमन कमिशनला संघीय** तर **नेहरू अहवाला**मध्ये **एकात्म कारभार नमूद** केला होता.
- **सर्व संस्थानिकांनी संघीय कारभाराला मान्यता दिली.**

- मात्र काँग्रेसशिवाय ह्या चर्चांना अर्थ नसल्याने मार्च 1931 मध्ये गांधी–आयर्विन करार झाला, यामध्ये काँग्रेसने गांधीजींना एकमेव प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेला (1 सप्टेंबर 1931 ते 1 डिसेंबर 1931) पाठवले. मात्र या ठिकाणी अल्पसंख्यांक, अस्पृश्य यांच्या मागण्यांपुढे हतबल होऊन गांधीजी परत भारतात आले.
- तिसरी गोलमेज परिषद **17 नोव्हेंबर 1932** रोजी सुरू झाली. याला 43 सदस्य हजर होते. मात्र परिषदेला **ब्रिटनचा लेबर पक्ष, भारतीय काँग्रेस व संस्थानिक हजर नव्हते.**
- तिसरी परिषद 24 डिसेंबर 1932 रोजी संपली. त्यानंतर 1933 मध्ये श्वेतपत्रिका काढण्यात आली.
- एप्रिल 1933 मध्ये लॉर्ड लिनलिथगो यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त निवड समिती स्थापन करण्यात आली. 18 महिने बैठका झाल्या. मात्र गोलमेज परिषदेतील विवादित मुद्दे **मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुका प्रत्यक्ष घ्यायच्या की अप्रत्य यावर एकमत झाले नाही.** शेवटी समितीने दोन्ही सभागृहांच्या निवडणुका अप्रत्यक्ष घेण्याची शिफारस केली. पण ती शिफारस ब्रिटनच्या लॉर्ड सभागृहाने अमान्य केली.

**यामधील भागामध्ये बऱ्याच DETAILS आहेत. त्या येथे देणे संयुक्तीक नाही. मात्र आपण इतिहासाच्या ONLINE लेक्चरमध्ये DETAILED घेऊ. (लवकरच Online Platform वर आपल्या सर्वांचे Pravin Chormale's Master Class वर स्वागत...**

3. **खालीलपैकी कोणते विधान सत्य नाही?**
**(गट–क पूर्व 2021)**
(1) भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीची तारीख 26 नोव्हेंबर 1949 आहे.
(2) 42 व्या घटनादुरुस्तीन्वये 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द जोडण्यात आला.
(3) 42 वी घटनादुरुस्ती 1976 मध्ये करण्यात आली.
(4) भारतीय राज्यघटनेतील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय हे तत्त्व रशियन (सोव्हिएट) राज्यघटनेतून घेतले आहेत.

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 1**

**26 नोव्हेंबर 1949**

- **26 नोव्हेंबर 1949** रोजी राज्यघटनेच्या मसुद्याचा ठराव संमत करण्यात आला. हाच दिनांक सरनाम्यात नमूद केला आहे. य़ा दिवशी घटना समितीने घटना स्वीकृत करुन, अधिनियमित करुन स्वतःप्रत अर्पण करीत आहोत असे म्हटले.

**26 जानेवारी 1950**

- भारतीय राज्यघटनेत या दिवसाचा उल्लेख **'घटना अंमलात आल्याचा दिनांक'** असा केला गेला आहे.
- हा दिवस **'प्रजासत्ताक दिन'** म्हणून साजरा केला जातो.

**42 वी घटनादुरुस्ती**

- सन 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये सरनाम्यात **प्रथमच दुरुस्ती** करण्यात आली.
- या घटनादुरुस्तीने सरनाम्यात **समाजवादी, धर्मनिरपेक्ष** आणि **एकात्मता** या तीन शद्बांचा नव्याने समावेश करण्यात आला.

**Q. PATTERN**

- **आयोगाच्या चुकविण्याच्या जागा व पद्धत : M. imp**
- **प्र. क्र. 3 मध्ये दिलेल्या विधानावरून आपणास इतर महत्त्वाच्या बाबी समजणे गरजेचे आहे.**
- **आयोग वरील विधानांमध्येच काही बदल करून नवीन चुकविण्याची पद्धत शोधू शकतो. याकडे आपण Q. Papers Analysis करताना लक्ष दिले पाहिजे. उदा. योग्य विधाने ओळखा.**

  **अ. सरनाम्यामध्ये 26 जानेवारी 1950 हा दिनांक नमूद करण्यात आला आहे.**

  **ब. घटनेचा मसुदा संमत करण्यात आलेली तारीख ही 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरी केली जाते.**

  **क. 42 वी घटनादुरुस्तीने सरनाम्यामध्ये समाजवादी धर्मनिरपेक्ष, एकता यांचा समावेश केला.**

- **वरील विधाने वाचून आपणाला याची उत्तरे येत असतील तर आपण वाचतना Exam Oriented वाचत आहोत, हे सिद्ध होते आणि जर येत नसेल तर आपण आहे ते Material व्यवस्थित वाचणे गरजेचे आहे. तरच Result येऊ शकतो, हे समजून घ्यावे.**

## (2) 1947 चा कायदा

1. **1947 च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याने संविधान सभेच्या स्थानामध्ये बदल झाला. या कायद्याच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही? (ASO 2016)**
   1) सभा पूर्णत: सार्वभौम संस्था बनली.

PART

2



# अर्थशास्त्र

# विभाग



# 1 नियोजन (Planning)/ इतर योजना

## 1.1 राष्ट्रीय उत्पन्न समिती

### आवाका

**भारतीय नियोजन**

- **पार्श्वभूमी**
  - नियोजन आयोग
  - नीती आयोग
- **मूलभूत तत्त्वे**
  - स्वातंत्र्यानंतर वृद्धीकरिताचे साधन
  - नियोजन काळातील कल
  - आर्थिक उद्दिष्ट्ये
- **नियोजनाची प्रतिमाने**
  - कालावधी
  - उद्दिष्ट्ये
  - वृद्धी दर
- **पहिली योजना**
  - कालावधी
  - प्रकल्प
  - प्रतिमान
- **दुसरी योजना**
  - महालनोबीस प्रतिमान
- **चौथी योजना**
  - महत्त्वाच्या घटना
- **नववी योजना**
  - सेवा क्षेत्राचा वृद्धीदर जास्त असण्याचे कारण.
- **11 वी योजना**
  - महत्त्वाच्या कृषी योजना.
  - उद्दिष्ट्ये : जलद सर्वसमावेशी
  - Targets - GDP /इतर
  - प्रमुख उद्दिष्ट
- **12 वी योजना**
  - मुख्य लक्ष
  - नियोजन आयोगाचे अध्यक्ष
  - कालावधी, कृषी, उद्योग, सेवा दर
- **क्षेत्रांचा GDP मधील वाटा/दर**
  - 1950-2010 प्राथमिक क्षेत्राचा वाटा
  - 1981-2012 मधील GDP वाटा
  - GDP सर्वाधिक दर : 2006-07

**1. पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे?** (STI 2015)

अ) स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने राष्ट्रीय उत्पन्न समिती ऑगस्ट 1948 मध्ये नेमली.

ब) प्रोफेसर डी. आर. गाडगीळ हे तिचे अध्यक्ष होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ अ 2) केवळ ब

3) अ आणि ब दोन्ही योग्य 4) अ व ब दोन्ही अयोग्य

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

**राष्ट्रीय उत्पन्न समिती**

**राष्ट्रीय उत्पन्न समिती :**

- **स्थापना :** 4 ऑगस्ट 1949
- **अध्यक्ष :** प्रो. पी. सी. महालनोबिस
- **सदस्य :** 1) प्रो. डी. आर. गाडगीळ,
  2) डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव
- **पाहणी :** 1950-51 मध्ये केली
- **अंतिम अहवाल :** 1954

**निष्कर्ष**

1. या समितीने राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची **'निव्वळ उत्पादन पद्धत'** आणि **'निव्वळ उत्पन्न पद्धत'** सुचविली.
2. 1950-51 मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा **निम्म्याच्या जवळपास** आहे.

3. खाणकाम उत्पादन व हस्त व्यवसायाचा वाटा 1/6 पर्यंत आहे.
4. वाहतूक व दळण वळण, वाणिज्याचा वाटा 1/6 पेक्षा थोडा जास्त आहे.
5. सेवा क्षेत्राचा साधारण : **1/3 वाटा** आहे.
6. निव्वळ देशांतर्गत उत्पन्नात शासकीय क्षेत्राचा वाटा 7.6 % पर्यंत आहे.
7. या समितीने भारताचे **राष्ट्रीय उत्पन्न 8650 कोटी रू.** व दरडोई **उत्पन्न 246.90** रूपये असण्याचा अंदाज मांडला.

**Q. Pattern :**

- आयोगाने प्रश्नांमध्ये **ऑगस्ट 1948** दिले आहे, परंतु ते **ऑगस्ट 1949** आहे. विद्यार्थ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. दुसऱ्या पर्यायामध्ये जे सदस्य आहेत, त्यांच्यासाठी त्यांना अध्यक्ष म्हणून वाक्य केले आहे. यापुढे प्रो. डी. आर. गाडगीळ की व्ही. आर. गाडगीळ वा अन्य प्रसिद्ध गाडगीळ आडनावाची व्यक्ती देऊन चुकवू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रश्नांच्या सर्व बाबींवर अचूक लक्ष देणे गरजेचे आहे.

**Prediction :**

- आपण नेहमी माहिती वा facts वाचत असतो. मात्र परिक्षाभिमुख वाचन (exam oriented reading) करित नसतो.

  उदा. आपणाला वरील प्रश्नांमध्ये माहिती दिली आहे. मात्र दिलेल्या माहितीमधील imp facts कोणत्या?
- आयोग यापुढे कोणत्या बाबी, कशाप्रकारे विचारू शकतो. याचा विचार करायला हवा. यामध्ये जर आयोगाने निष्कर्षाबाबत विचारले तर ते खालीलप्रमाणे व त्याच बाबींवर विचारू शकतो.

  उदा. **योग्य विधाने ओळखा.** (राष्ट्रीय उत्पन्न समितीने काढलेल्या निष्कर्षाबाबत)

  (अ) 1950-51 मध्ये कृषी व संलग्न क्षेत्राचा वाटा दोन तृतीयांश होता.

  (ब) 1950-51 मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा एक तृतीयांश होता.

  (क) या कालावधीत दरडोई उत्पन्न 299 रु. होते.
- वरील विधाने व्यवस्थित वाचा. या ठिकाणी काही पण आहेत. **आयोगाने राष्ट्रीय उत्पन्न देताना 246.90 (पॉईंटमध्ये) दिल्यास ते बहुधा योग्य असते.** तसेच दोन्ही विधाने (अ, ब) मिळून 100% होते तर त्यापैकी एक चुकीचे हे समजले पाहिजे. त्याप्रमाणे पर्याय दिलेले असतात. त्यामुळे फक्त facts ऐवजी आयोगाचा कल समजून घेतला पाहिजे.

**2. भारत सरकार द्वारा प्रा.पी.सी. महालनोबीस यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय उत्पन्न समितीचे गठण कोणत्या वर्षी करण्यात आले?** **(PSI 2014)**

1) 1951 2) 1949
3) 1948 4) 1956

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 2**

**(प्र.क्र. 1 चे स्पष्टीकरण पाहणे)**

**IMP :**

- 2014 च्या PSI मध्ये फक्त राष्ट्रीय उत्पन्न समितीची स्थापना विचारली होती, त्यानंतर 2015 च्या STI मध्ये त्याची वाक्ये बनवण्यात आली.
- याचाच अर्थ विद्यार्थ्यांनी एखादा घटक परिपूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे, त्याच्याशी संबंधित अधिक बाबींची परिक्षाभिमुख माहिती करून घ्यावी.

| मोजणी वर्ष | तज्ज्ञ | राष्ट्रीय उत्पन्न (कोटी रुपये) | दरडोई उत्पन्न (रुपये) |
|---|---|---|---|
| 1868 | दादाभाई नौरोजी | 340 | 20 |
| 1913-14 | वाडिया व जोशी | 1067 | 44.30 |
| 1925-29 | V. K. R. V. राव | 2301 | 78 |
| 1948-49 | राष्ट्रीय उत्पन्न समिती | 8650 | 246.90 |

- व्ही. के. आर. व्ही. राव यांनी 1925 ते 29 या कालावधीसाठी राष्ट्रीय उत्पन्न 2301 कोटी रु. तर दरदोई उत्पन्न 78/- सांगितले. (1931-32 मध्ये 1689 कोटी व 62 रु.)
- सर्वप्रथम वैज्ञानिक पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली. त्यामुळे त्यांना **'राष्ट्रीय लेखा प्रणाली'**चे **जनक** मानतात.

PART


3





# इतिहास

# विभाग



# 1 आदिवासी व शेतकरी उठाव

## 1.1 आदिवासी व शेतकरी उठाव

### 1 आदिवासी भिल्लांचा उठाव

**आवाका**

**घटक** — • भिल्ल, रामोशी, कोळी, संथाळांच्या उठावाचा समावेश

**Q. Pattern :**

⌖ आयोगाचा प्रश्न विचारण्याचा कल मुख्यत: factual आहे. यामध्ये उठावाचे वर्ष, नेतृत्त्व, ठिकाण, कारण व परिणाम या 5 घटकांभोवतीच फिरते याशिवाय महत्वाच्या लढाया व ब्रिटिशांचा सहभाग/ प्रतिकार यावर ही प्रश्न विचारण्यात आला आहे

**Prediction :**

⌖ इतर महत्वपूर्ण घटक व महाराष्ट्रातील महत्त्वाचे उठाव याबाबत इत्यभूंत माहिती असणे गरजेचे आहे.

1. **आदीवासी शेतकऱ्यांच्या क्रांतीचा पहिला नायक कोण होता?** (Combined Pre. 2021)

अ. बाबा भांड | ब. बिजनिया
क. कजर सिंग | ड. तंट्या भिल्ल

**वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत?**

(1) फक्त अ आणि ब | (2) फक्त क आणि ड
(3) फक्त ब | (4) फक्त ड

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

- **'तंट्या भिल्ल'** यांचा जन्म सध्याच्या छत्तीसगढमधील बदादा गावातील. त्यांचे शिक्षण झालेले नव्हते, मात्र तात्या टोपे यांच्या लोकजागरण कार्यक्रमातून त्यांना स्वातंत्र्यसेनानी कसे इंग्रजांचा विरोध करीत आहेत, हे समजले होते. त्यांचे खरे नाव रंड्रा भिल्ल होते. ते क्रांतिकारकांच्या कथा ऐकून तसे साहस प्रकार जंगलात करायचे. त्यांचे युद्ध कौशल्य बघून **तात्या टोपे यांनी त्यांना गनिमी काव्याचे प्रशिक्षण दिले.** नेमबाजीमध्ये त्यांना निपुण केले.
- त्यांनी इंग्रजांना 1857 ते 1889 या काळात गोरीला युद्धाने जेरीस आणले.
- त्यांनी इंग्रजांना लुटून ते गोरगरिबांना संपत्ती वाटत असत. लोकांचा त्यांना मोठा पाठिंबा होता. लोक त्यांना आदराने **'मामा'** म्हणत. त्यांनी या काळात एवढी दहशत निर्माण केली होती की, पोलीसांना तंटा चौकी उभ्या कराव्या लागल्या. त्यांना पकडण्यासाठी विविध बक्षिसे जाहीर केली. (10500रु. व 2500 एकर जमीन). मात्र त्यांचाच भाऊजी 'गणपत' या व्यक्तीने आमिषाला बळी पडून संपूर्ण माहिती दिली. आणि त्यांना पकडले. यांच्या अटकेची बातमी न्यूयॉर्क टाम्सने छापली, ज्यामध्ये **'भारताचा रॉबिनहूड'** उल्लेख करण्यात आला. यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून जबलपूर जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली. त्यांना **4 डिसेंबर 1889 रोजी फाशी देण्यात आली.** फाशीनंतर त्यांचा देह पाताळपाणी रेल्वेस्थानकावर टाकून देण्यात आला होता. याच ठिकाणी त्यांची समाधी बनवण्यात आली व आता या रेल्वे स्थानकाला त्यांचे नाव देण्यात आले आहे. **'मध्यप्रदेशचे नायक'** म्हणून ओळखले जाणारे तंट्या भिल्ल यांच्यावर 2012 मध्ये चित्रपट बनवण्यात आला.

2. **ब्रिटिश व भिल्ल यांच्यातील कोणत्या युद्धात कॅप्टन हेन्री मारला गेला?** (STI 2015)

1) अंबापाणी | 2) नांदगांव
3) नांदुरशिंगोटे | 4) पेठ-सुरगाणा

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 3**

### भिल्ल उठाव

- 1833 मध्ये नांदुरशिंगोटे येथे झालेल्या ब्रिटिश व भिल्ल युद्धात कॅप्टन हेन्री मारला गेला.
- कॅप्टन हेन्री हा बंगाल नेटिव्ह इंन्फंट्री मधील 37 व्या रेजिमेंटमधील कॅप्टन होता.
- याचे पडसाद तीव्रपणे उमटले नंतर भिल्लांना दडपण्यासाठी ब्रिटिशांनी प्रचंड फौज वापरली.

| क्र. | उठाव | वर्ष | नेतृत्त्व | उठावाचे कारण |
|---|---|---|---|---|
| 1 | **भिल्ल** | 1817 | चिलनाईक | सरकारने भिल्लांच्या जमिनी बळकावल्यामुळे उठाव केला. |
| 2 | **कोळी** | 1824 –30 | रामजी भांगडिया | किल्ल्यांच्या बंदोबस्तामधले त्यांचे महत्त्वाचे पद गेले, परीणामी उपासमारीची वेळ आली म्हणून उठाव केला. |
| 3 | **पागल पंथी** | 1825 | करीमशाहचा मुलगा टिपू | बंगालमधील हा विद्रोह जमीनदारांविरूद्ध होता. |
| 4 | **फरेजी उठाव** | 1838 | शरीयत उल्ला | |

### पागल पंथियांचा उठाव - 1825

- **'करीमशाह'** याने उत्तर बंगालमध्ये **'पागलपंथ'** म्हणून ओळखला जाणारा एक अर्ध धार्मिक संप्रदाय सुरु केला.
- जमिनदारांच्या अत्याचाराविरुध्द बंड केले.
- करिमशाहचा मुलगा टिपू – 1825 मध्ये शेरपूरचा राजा बनला.
- हे बंड गारो टेकडयांपर्यंत पसरले.

### फरेजी उठाव - 1838

- फरेजी हे लोक बंगालमधील फरीदपूरचा रहीवासी **हाजी शरीयतुल्ला** याने स्थापन केलेल्या पंथाचे अनुयायी होते. हे लोक धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन व्हावे या मताचे होते.
- शरीयतुल्लाचा मुलगा **'दादुमिया'** याने बंगालमधून इंग्रजांची हकालपट्टी करण्याची योजना बनवली होती.

**3 कोठे आदिवासी 'भिल्लांचा उठाव तीव्र स्वरूपाचा होता?**

**(ASO 2013)**

अ) खानदेशात ब) नगर जिल्ह्यात

क) कोल्हापूर ड) सोलापूर

**पर्यायी उत्तरे**

1) अ आणि ब 2) क आणि ड

3) ड फक्त 4) अ फक्त

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

### भिल्ल उठाव - (1817, 1825, 1857)

- भिल्लांची वस्ती **अरवली, विंध्य, सह्याद्री व सातपुडा पर्वतरांगात असून सर्वात जास्त वस्ती खानदेशात** आहे.
- **1817** रोजी भिल्लांनी सातमाळा, अजिंठा भागात उठाव केले.
  - ➢ तेथे **कॅप्टन ब्रिग्ज** हा कलेक्टर होता. (खानेदशची जबाबदारी.)
  - ➢ उठाव दडपण्याचा प्रयत्न झाला पण **सर्वत्र यश** आले **नाही.**
  - ➢ भिल्लांच्या प्रमुख तसेच **सातमाळाच्या चिलनाईक** यांनी **उठाव सुरू** ठेवले.
  - ➢ उठावाचे प्रमुख कारण नव्या शासना प्रती **संशयाची भावना व शेती** करताना सोसावे लागणारे कष्ट हे होते.
- **1825 मध्ये सेवारामच्या** नेतृत्वाखाली **पुन्हा बंड** केले. पुढे **1831 व 1846** मध्ये बंड झाले.
- 1857 मध्ये **काजीसिंग** (खर्जासिंग) याच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी खानदेशात उठाव केला.
- भिमा नाईक, भागोजी नाईक, दौलतसिंग, कुजरसिंग यांच्या नेतृत्वाखाली 1870 पर्यंत भिल्ल हे इंग्रजांविरूद्ध लढा देत होते.

## 2 रामोशी उठाव

**1. रामोशींबाबत पुढीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?**

**(PSI 2013)**

1) कधी काळी, इंग्रज येण्याआगोदर ते दरोडेखोरी करीत.
2) सर्वच रामोशी दरोडेखोर नव्हते.
3) इंग्रजांच्या साम्राज्यात त्यांचे महत्त्व कमी झाल्याने व इनामे खालसा झाल्याने ते दरोडेखोर बनले.
4) वरीलपैकी एकही अयोग्य नाही.

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

- **रामोशी ही महाराष्ट्रातील एक कणखर व चपळ असणारी जमात होती.**
- पोट भरण्यासाठी कामधंदा करण्यापेक्षा दरोडे, चोऱ्या, खून, लूटमार, असे उद्योग ते करत.
- मात्र सर्व रामोशी वरील उद्योग करीत नव्हते तर काही राखणदार, किल्ल्यांवरती पाहणी, गस्त घालणे, सैन्यामध्ये लढाई करणे असेही कामे करत. **सर्वच रामोशी दरोडखोर नव्हते.**
- इंग्रजांच्या काळात रामोशांची वतने, कामे, इनामे गेली त्यामुळे ते पुन्हा दरोडेखोर बनले. **परिणामी सर्व विधाने बरोबर आहेत.**
  - ➢ रामोशी पश्चिम घाटात राहणारी जमात आहे. इंग्रज सत्ता व त्यांच्या प्रशासन पद्धतीमुळे रामोशी अस्वस्थ होते. 1822 मध्ये **रामोशी सरदार चित्तरसिंहने बंड** पुकारुन साताऱ्याच्या आसपासचा प्रदेश लुटायला सुरुवात केली. 1825–26 व 1829 पर्यंत ह्या प्रदेशात वातावरण अस्वस्थतेचे होते.

PART

4





# भूगोल विभाग



# 1 भारताचा भूगोल

## 1 भारतीय प्रमाणवेळ

**1. सौराष्ट्र व अरुणाचल प्रदेश यातील स्थानिक वेळेत किती तासांचा फरक आहे? (Combined 2017)**

1) 3 तास 2) 2 तास
3) 1 तास 4) 4 तास

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 2**

- रेखावृत्तामुळे एखाद्या ठिकाणाच्या वेळेबाबत अंदाज केला जाऊ शकतो, म्हणून एखाद्या ठिकाणाची वेळ ठरविण्यासाठी पृथ्वीची दैनिक गती व रेखावृत्ते यांचा उपयोग होतो. भारतातील सौराष्ट्र व अरुणाचल प्रदेश यांच्या स्थानिक वेळेत 2 तासांचा फरक पडतो. **कारण भारताच्या रेखावृत्तामध्ये ($68^0$ ते $97^0$) 29.5 चा फरक आहे. 1 रेखावृत्त ओलांडण्यासाठी 4 मिनिटे लागतात. त्यामुळे 29.5 × 4 = 118 मिनिटे.**
- पृथ्वीची परिवलनाची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. त्यामुळे परिवलनादरम्यान पश्चिमेकडील रेखावृत्ते क्रमाने सुर्यासमोर येतात तर पुर्वेकडील रेखावृत्ते अंधारात जातात.
- **पृथ्वीचे परिवलन :** रोटेशन : पृथ्वीच्या परिवलनामध्ये प्रत्येक ठिकाण 24 तासामध्ये 40000 कि.मी. वेगाने फिरते. ध्रुवावर हा वेग शून्य असतो.

**2. पहाटे 3.00 वाजता लंडन येथून प्रसारीत होणारी बातमी अलाहाबाद ($82^\circ$ 30′ पूर्व रेखावृत्त) येथे किती वाजता ऐकायला येईल? (PSI 2013)**

1) रात्री 8.30 वाजता 2) सकाळी 9.30 वाजता
3) सकाळी 7.30 वाजता 4) सकाळी 8.30 वाजता

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

- पृथ्वीला रेखावृत्त व अक्षवृत्त या काल्पनिक रेषांनी विभागले आहे.
- रेखावृत्तामुळे निश्चित स्थान व स्थानिक वेळ समजण्यास मदत होते.
- $0^\circ$ रेखावृत्ताला **'प्रमाण रेखावृत्त'** म्हणतात ते ग्रीनीच (इंग्लड) शहराजवळून गेले आहे.
- इतर देशाची स्थानिक वेळ **'0' रेखावृत्ताची वेळ प्रमाण मानुन निश्चित करतात'**
- भारताची प्रमाणवेळ 82 1/2 ($80^\circ$ 30′) पूर्व या रेखावृत्तांवर निश्चित करण्यात आलेली आहे. कारण हे रेखावृत्त भारताच्या मध्यातून जाते. (मिर्झापूर, अलाहाबाद – उत्तर प्रदेश)
- ग्रीनीच शहरापेक्षा **भारताची स्थानिक वेळ 5 तास 30 मिनिटांनी** पुढे आहे.
- पृथ्वी 24 तासात $360^\circ$ फिरते. (म्हणजेच 360 रेखावृत्ते ओलाडंते)

  24 तास = $360^\circ$
  1 तास = $360^\circ/24$
  = 15 रेखावृत्ते
- 1 रेखावृत्ते = 4 मिनिटे
- म्हणजेच पृथ्वीला एक रेखावृत्त ओलांडण्यास 4 मिनिटाचा कालावधी लागतो.
  - ➢ $82^\circ$30′ पूर्व रेखावृत्त = 82.5 × 4
  - ➢ (भारताचे प्रमाण रेखावृत्त) = 330 मिनिटे (5 तास 30 मिनिटे).
  - ➢ लंडन येथे 3 वाजले असताना भारतात 3 + 5.30 → 8.30 वाजले असतील.

**3. भारतीय प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावर निश्चित केली गेली आहे? (PSI 2012)**

1) $82^\circ$ 30′ पश्चिम 2) $28^\circ$ 30′ पूर्व
3) $82^\circ$ 30′ पूर्व 4) $82^\circ$ 30′ उत्तर

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 3**

**भारतीय प्रमाणवेळ रेखावृत्त**

- भारताची प्रमाणवेळ ही $82\frac{1}{2}$ पूर्व रेखावृत्तावर निश्चित करण्यात आली आहे.

- हे रेखावृत्त उत्तरप्रदेशातील अलाहाबाद जिल्ह्यातील, मिर्झापूर शहराजवळ असलेल्या शंकरगड किल्ल्या जवळून गेलेला आहे.
- त्याचबरोबर हे **रेखावृत्त उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, आंध्रप्रदेश या पाच राज्यातून** गेलेले आहे. (उत्तरेकडून दक्षिणेकडे)

**भारताचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार**

- भारताचा **अक्षवृत्तीय विस्तार** 8°4′.28″ उत्तर अक्षवृत्त ते 37°6′.53″ उत्तर अक्षवृत्त आहे.
- भारताचा **रेखावृत्तीय विस्तार** 68°7′33′ पूर्व रेखावृत्त ते 97°25′47″ पूर्व रेखावृत्त आहे.
- ज्या देशांचा पुर्व-पश्चिम विस्तार जास्त असतो, त्या देशांची प्रमाणवेळ ही मध्यवर्ती रेखावृत्ताची स्थानिक वेळ असते.

**कर्कवृत्त -23 1/2$^0$ उत्तर**

- भारताच्या मध्यातून गेले आहे. त्यामुळे भारताचे तापमानाच्या दृष्टिकोनातून उष्णकटिबंध व समशितोष्ण कटीबंध अशा दोन विभागात विभाजन झाले आहे. भारताच्या मध्यातून जाणारे **कर्कवृत्त भारतातील 8 राज्यातून जाते.**
- **राज्य : गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, पश्चिम बंगाल, त्रिपुरा व मिझोराम.**
- गुजरात (गांधीनगर), राजस्थान (बनसावरा), मध्यप्रदेश (विहिशा), छत्तीसगड (अंबिकापूर), **झारखंड (रांची)**, पश्चिम बंगाल (कृष्णनगर), त्रिपूरा (उदयपूर), मिझोराम (शियालूक).

**भारतीय प्रमाणवेळ रेखावृत्त**

- एप्रिल 2006 पासुन श्रीलंकेनेसुदधा आपली प्रमाणवेळ 82°30′ या रेखावृत्तानुसार निश्चित केली आहे.

---

**4. भारतीय प्रमाण वेळ आणि ग्रीनिच प्रमाण वेळ यांच्यात ....... अंतर आहे.** **(STI 2012)**

1) पाच तास　　2) सहा तास
3) साडे चार तास　　4) साडे पाच तास

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

**भारतीय प्रमाणवेळ**

- 0° रेखावृत्त/मुळ रेखावृत्त/ ग्रिनिच रेखावृत्तानुसार आंतरराष्ट्रीय वेळ निश्चित केली जाते.
- मुळ रेखावृत्तांपासुन पुर्वेकडील रेखावृत्तांवर वेळ ही वाढत जाते. उदा- भारत हा रेखावृत्तीय दृष्ट्या पुर्व गोलार्धात आहे. त्यामुळे भारताची वेळ ग्रिनिच प्रमाण वेळेपेक्षा पुढे आहे.
- मुळ रेखावृत्तापासुन पश्चिमेकडील रेखावृत्तांवर मात्र वेळ ही ग्रिनिच प्रमाणवेळेपेक्षा मागे असते. उदा- ब्राझील. ब्राझीलची प्रमाणवेळ ग्रिनिच प्रमाणवेळेपेक्षा 3 तास मागे आहे. (संदर्भ - 10 वी भुगोल नवीन)
- मुळ रेखावृत्त आणि भारतीय प्रमाणवेळ रेखावृत्त (82°30′ पुर्व) यामध्ये 82°5 रेखावृत्तांचा फरक आहे.
  म्हणुन 82.5 × 4 मिनिटे = 330 मी.
  (दोन रेखावृत्तांमधील फरक हा 4 मिनिटे इतका असतो)
- त्यामुळे भारतीय प्रमाणवेळ ही ग्रिनिच प्रमाणवेळेपेक्षा 5 तास 30 मिनिटे किंवा 330 मिनिट ने पुढे आहे.
- भारतातील वेळेच्या अचुकतेसंदर्भातील सेवा National Physical Laboratory - नवी दिल्ली ही संस्था पुरवते.

## 1.1 रेखांश/रेखावृत्ते

**1. भारताचे सर्वात पूर्वेकडील रेखावृत्त ....... आहे.** **(ASO 2014)**

1) 97$^0$ 25$^{|}$ E　　2) 68$^0$ 7$^{|}$ E
3) 82$^0$ 50$^{|}$ E　　4) 90$^0$ 25$^{|}$ E

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 1**

**भारताचे अक्षांश व रेखांशामध्ये स्थान**

- अक्षांश - 8°4′28′′ते 37°6′53′′उत्तर अक्षांश (8° ते 37° उत्तर अक्षांश)
- रेखांश - 68°7′ ते 97°25′पूर्व रेखांश (68° ते 97° पूर्व रेखांश)
- (दोन्हीमधील फरक जवळ-जवळ सारखा म्हणजे 29° चा आहे).
  - भारताचे उत्तरेकडील टोक : दफदार (काश्मीर)
  - भारताचे दक्षिणेकडील जमिनीवरील टोक : कन्याकुमारी (मुख्य भुमी)
  - भारताचे सर्वात दक्षिणेकडील टोक : इंदिरा पॉइट (6°45′उत्तर अक्षवृत्तावर)
  - भारताचे पूर्व टोक : किबिथू (अरूणाचल प्रदेश)
  - भारताचे पश्चिम टोक : घुअर मोटा (गुजरात)
  - भारताची दक्षिणोत्तर लांबी : 3214 कि. मी.
  - भारताची पूर्व-पश्चिम लांबी : 2933 कि. मी.

| | अक्षवृत्त Latitude | रेखावृत्त Longitude |
|---|---|---|
| 1 | आडव्या वर्तुळाकार रेषा | उभ्या अर्धवर्तुळाकार रेषा |
| 2 | पृथ्वीचे उत्तर व दक्षिण गोलार्ध असे 2 भाग पडतात. | पृथ्वीचे पुर्व व पश्चिम गोलार्ध असे 2 भाग पडतात. |
| 3 | एकुन 181 आहेत | एकुन 360 आहेत. |

PART

5




# सा. विज्ञान

# विभाग

# 1



# भौतिकशास्त्र

## 1.1 राशी आणि राशीचे मापन

1. व्हर्नियर कैवारच्या व्हर्नियर स्केल वर 25 खुणा असून मुख्य मापनपट्टीवरील लघुत्तम अंतर 1 मी.मी. आहे म्हणून व्हर्नियर कैवारचे लघुत्तम माप किती मी.मी. येईल? (PSI 2012)
   1) 0.25 2) 0.04
   3) 2.5 4) 1.25

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 2**

- $\frac{1}{25}$ व्हर्नियर कैवारच्या व्हर्नियर स्केलच्या साहाय्याने लघुत्तम माप मी.मी.मध्ये
- $\frac{100}{25} = 0.04mm$ हे माप वैज्ञानिकदृष्ट्या अचूक मानले जाते.

**भौतिक राशी**

- **पायाभूत एकके** (Fundamental Units)
  - स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व
  - SI पद्धतीत 7 एकके
    1. **लांबी :** मीटर (m)
    2. **वस्तुमान :** किलोग्रॅम (kg)
    3. **काळ :** सेकंद (s)
    4. **विद्युतप्रवाह :** ॲम्पीयर (A)
    5. **तापमान :** केल्विन (k)
    6. **पदार्थाचे परिमाण :** मोल (mol)
    7. **प्रकाशाची तीव्रता :** कँडेला (cd)
- **साधित एकके** (Derived Units)
  - दोन किंवा अधिक मूलभूत एककांपासून तयार.
  - वेग = लांबी × काळ

**लांबीचे मापन करण्यासाठी खालील पद्धती/उपकरणे वापरतात.**

**1. मीटर पद्धती :**

- $10^{-3}m$ ते $10^{2}m$ : दरम्यानचे अंतर काढण्यासाठी 1mm – 100m पर्यंत (mm मिलीमीटर)

**2. व्हर्नियर कैवार :**

- $10^{-4}m$ (0.1mm) पर्यंतचे मापनासाठी याचा last count हा 0.1mm असतो. म्हणजेच 1mm ते 0.1mm पर्यंतचे मोजमाप व्हर्नियरने. याच्या स्केलवर 25 खुणा असतात.

**3. स्क्रूमापी वा स्फीरोमीटर :**

- $10^{-5}m$ (0.01mm) इतक्या छोट्या अंतराचे मोजमाप.

**4. इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक/प्रकाशित सूक्ष्मदर्शक :**

- अत्यंत सूक्ष्म मोजमाप उदा. रेणू $10^{-8}m/10^{-10}m$

**पॅरॅलॅक्स पद्धत :**

- पृथ्वीपासून इतर ग्रहे, तारे यांची अंतरे मोजण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो.

**प्रकाशिय सूक्ष्मदर्शक :**

- 400nm ते 700nm (नॅनोमीटर) या मर्यादेत. (1 नॅनोमीटर म्हणजे $10^{-9}m$) त्यापेक्षा लहान आकाराचे मापन करण्यासाठी इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक वापरले जाते.

## 1.2 चाल, वेग आणि विस्थापन

1. एका 257g वजनाच्या चेंडुचा वेग 257 m/s असेल तर त्याची तरंगलांबी ____________ m इतकी असते. दिले गेले आहे : $h = 6.626 \times 10^{-34}$ J/s (गट–क पूर्व 2018)
   (1) $10^{-35}$ (2) $10^{-32}$
   (3) $10^{-38}$ (4) वरीलपैकी कोणतेही नाही

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 1**

2. **एक व्यक्ती 72 किमी अंतराचा प्रवास 4 तासात पूर्ण करतो. तर त्याची सरासरी चाल ....... आहे.** **(STI 2012)**
1) 5 km/s 2) 18 km/s
3) 18 m/s 4) 5 m/s

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

d = 72 Km
t = 4 hr.
चाल (speed)
$speed = \frac{dis}{time}$
$\frac{72}{4} = 18$
$S = 18 \times \frac{5}{18} (m/s)$
speed = 5m/s

## 1.3 वजन, वस्तुमान आणि घनता

1. **........ वस्तूचे वजन सर्वात जास्त असते.** **(STI 2013)**
1) पृथ्वीच्या ध्रुवांवर 2) पृथ्वीच्या विषुववृत्तावर
3) पृथ्वीच्या अंतर्भागामध्ये 4) पृथ्वीच्या पृष्ठभागावर

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 1**

- $g = GM/R^2$ **(पृथ्वीचे गुरुत्वीय त्वरण)**
  - ➢ ध्रुवाजवळ पृथ्वी थोडी चपटी असते म्हणजे तेथे त्रिज्या सर्वात कमी असते. म्हणजे त्रिज्या कमी असेल तर गुरूत्वत्वरण वाढते.
  - ➢ वस्तूचे वजन = mg म्हणजे (गुरुत्व त्वरण) g वाढल्यास वजन वाढते.
  - ➢ परिणामी, पृथ्वीच्या ध्रुवावर गुरूत्वरण जास्त असल्यामुळे वजन सर्वाधिक असते.

## 1.4 गती व बल

1. **''प्रत्येक क्रियेकरता तेवढीच व विरुद्ध प्रतिक्रिया असते.'' हा कोणता सिद्धांत/नियम आहे?** **(ASO 2012)**
1) बॉइल्स्चा नियम
2) आर्किमिडिजचा सिद्धात
3) न्यूटनचा गतीचा दुसरा नियम
4) यापैकी कोणताही नाही

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 4**

- **न्यूटनचा तिसरा नियम :** प्रत्येक क्रियेकरीता तेवढीच व विरुद्ध क्रिया लागते.
- **न्यूटनचा दुसरा नियम :** संवेग परिवर्तनाचा दर प्रयुक्त बलाशी समानुपाती असतो.
- **आर्किमिडीजचे तत्व :** घन पदार्थ द्रवात अंशत: किंवा पूर्णत: बुडवल्यास तो त्याचा द्रवात बुडालेल्या, आकारमानाएवढा द्रव बाजूला सारतो. त्यावेळी पदार्थांच्या वजनात घट होते ही घट पदार्थाने बाजूला सारलेल्या द्रवाच्या वजनाएवढी असते

### सर आयझॅक न्यूटन



- जन्म 25 डिसेंबर 1642, मृत्यू - 20 मार्च 1727.
- आयझॅक न्यूटन हे भौतिकशास्त्रज्ञ व गणिती तज्ज्ञ होते.
- न्यूटन यांना त्यांच्या भौतिकशास्त्रातील व एकंदरीत कार्यासाठी **1705 मध्ये 'सर' हा इंग्लंडचा राजकिताब** मिळाला.

**न्यूटनचा गतिविषयक पहिला नियम (जडत्वाचा)**

- नियम - 'जर एखाद्या वस्तूवर कोणतेही बाह्य बल किंवा असंतुलित बल कार्यरत नसेल तर तिच्या विराम अवस्थेतील किंवा सरळ रेषेतील एकसमान गतीमध्ये सातत्य राहते.'
- पहिला नियम हा जडत्वाशी संबंधित आहे.

**न्यूटनचा गतिविषयक दुसरा नियम**

- नियम - 'संवेग परिवर्तनाचा दर प्रयुक्त बलाशी समानुपाती असतो आणि संवेगाचे परिवर्तन बलाच्या दिशेने होते.'
- सूत्र संवेग = वस्तुमान × वेग
- SI पद्धतीतील संवेगाचे एकक kg.m/s

**न्यूटनचा गतिविषयक तिसरा नियम (प्रतिक्रिया बल)**

- क्रियाबल आणि प्रतिक्रिया बल यांची परिमाणे समान असतात, परंतु त्यांची दिशा परस्पर विरुद्ध असतात. उदा.
  (1) बंदुकीतून सुटलेल्या गोळीनंतर बंदूक मागील बाजूस जाते. हा नियम प्रतिक्रिया बलाशी संबंधित असतो.
  (2) आग्निबाण (रॉकेट) च्या गतीसाठी वापरलेले तत्व न्यूटनच्या तिसऱ्या नियमावर आधारित आहे.

| | |
|---|---|
| मॉलिब्डेनम | 'कोबी'त व्हिपटेल रोग |
| पोटॅशियम | प्रथिन संश्लेषणात अडथळा |

**15. किटकनाशक आणि रोगनाशक द्रव्य खालीलपैकी कोणत्या वनस्पतीपासून मिळविता येते? (ASO 2012)**

1) कडूलिंब 2) जॅट्रोफा
3) बेशरम 4) वरील सर्व

**स्पष्टीकरण - उत्तर क्र. 1**

- **जॅट्रोफा** – ही वनस्पती इंधन मिळवण्यासाठी उपयोगी आहे. इंधन शेती म्हणून लागवड करतात.
- **बेशरम** – ही आगंतूक वनस्पती अजून परोपजीवी आहे.
- **कडूलिंब** – ही वनस्पती औषधी म्हणून ओळखली जाते. यात अनेक औषधी गुण आहेत.

अंकगणित व बुद्धिमत्ता तसेच चालू घडामोडी यांच्या प्रश्नांच्या स्पष्टीकरणासह PDF मोफत मिळविण्यासाठी 'Pravin Chormale's Master Class' हे ॲप डाऊनलोड करा.

# सुधारित आवृत्तीची वैशिष्ट्ये

| | | | |
|---|---|---|---|
| संपूर्णतः अपडेटेड गट 'ब' आणि 'क' चा समावेश | प्रत्येक प्रकरणाचा आवाका व क्वेश्चन पॅटर्न नमूद | 'लॉजिक डेव्हलपमेंट व प्रेडिक्शन मेथड' चा सुयोग्य वापर | 'लेटेस्ट टू ओल्ड' या ऑर्डर प्रमाणे सर्व प्रश्नांची रचना |
| परीक्षेस उपयुक्त व अत्यावश्यक स्पष्टीकरण | करंट नंबर्स सहित महत्वाच्या तक्त्यांचा समावेश | 100% बिनचूक व विश्वासार्ह माहितीचा समावेश | परीक्षापूर्व अभ्यासासाठी सर्वोत्तम मटेरियल |

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

**'मास्टर अॅनॅलिसीस सिरीज' अंतर्गत 'कंबाईन पूर्व - गट ब आणि क'** ही 6वी सुधारित आवृत्ती आपल्यासमोर सादर करत आहे. हे पुस्तक 2023 च्या सुधारित अभ्यासक्रमानुसार सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, दुय्यम निबंधक (श्रेणी 1/ मुद्रांक निरीक्षक), कर सहाय्यक, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उद्योग निरीक्षक, लिपिक टंकलेखक, तांत्रिक सहाय्यक (विमा संचालनालय) आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अशा सर्व 10 पदांसाठी खूपच फायदेशीर ठरणार आहे. त्यामुळे येणाऱ्या परीक्षेसाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा!

आपलाच,
**प्रा. प्रविण चोरमले**



**ऑनलाईन पुस्तके खरेदीसाठी:**
www.pravincpublication.com ला भेट द्या
किंवा क्युआर कोड स्कॅन करा

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
9700529393 | 9421763290
sales@pravincpublication.com